|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

**(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव)**

## विद्यापीठांतर्गत शैक्षणिक प्रशाळा व विभागातील विविध अभ्यासक्रमांचे माहे मे, जुन व जुलै-२०२१ मध्ये होणाऱ्या परीक्षांकरीता अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक.

## परिपत्रक क्र.७७/२०२१

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या सर्व महाविद्यालयात, विज्ञान व तंत्रज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन, मानवविज्ञान, आंतर-विद्याशाखीय अभ्यास या विद्याशाखेअंतर्गत शिकविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमांच्या विद्यापीठ पत्र क्र.KBCNMU/८/Academic Calender/२९५/२०२०, दिनांक ०३ नोव्हेंबर, २०२० अन्वये प्रसिध्द करण्यात आलेले शैक्षणिक वर्ष २०२०-२१ ची शैक्षणिक नियामिकानुसार माहे डिसेंबर - २०२० मध्ये होणाऱ्या विविध परीक्षांचे परीक्षा अर्ज सादर करण्यासाठीची कार्यक्रम पत्रिका सोबत जोडली आहे. तरी विविध अभ्यासक्रमांच्या माहे मे, जून, जुलै-२०२१ मध्ये होणा-या विविध परीक्षांचे परीक्षा अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक सोबत जोडले असून, वेळापत्रकात नमूद केलेल्या तारखांना सर्व संबंधित विद्यार्थ्यांकडून परीक्षा अर्ज भरुन घेऊन विहीत मुदतीत खालील कार्यपध्दतीनुसार विद्यापीठामध्ये सादर करावेत.

**कोवीड-१९ चा प्रादुर्भाव लक्षात घेता, विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रत्यक्ष न बोलविता, ऑनलाईन माध्यमाव्दारे अर्ज व शुल्क भरणेबाबत विदीत करावे. विद्यापीठामार्फत ऑनलाईन अर्ज व शुल्क भरण्याची सुविधा विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यांत आलेली आहे. कोवीड-१९ चा प्रादुर्भाव टाळण्यासाठी युजीसी आणि शासनाने दिलेल्या मार्गदर्शक तत्वांची कोटेकोरपणे अंमलबजावणी करुन सदरची प्रक्रिया पार पाडावी. सर्व विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज व शुल्क भरण्यासंदर्भात आपल्या स्तरावर प्रोत्साहित करावे, जेणेकरुन कोवीड-१९ च्या प्रादुर्भावास आळा बसेल.**

**अ) ई-सुविधेअंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांकरीता परीक्षा अर्ज भरण्यासंदर्भात सूचना :-**

एम.एड., बी.बी.एम. (बी.बी.एस.) सत्र १ ते ६, एम.बी.ए., एम.ए., एम.एस.डब्लू, एम.एस्सी., एम. टेक. सत्र-१ ते ४, एम.सी.ए./बी.एस्सी. ॲक्च्युरियल सायन्स सत्र-१ ते ६, बी.टेक. सत्र-१ ते ८, पी.जी.डिप्लोमा कोर्स (विधी)

१) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये प्रवेशित सत्र- २, ४, ६, व ८ च्या विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज संबंधित शैक्षणिक प्रशाळा/ विभागांनी प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती ऑनलाईन अपलोड केल्यानंतर परीक्षा अर्ज उपलब्ध करुन देण्यात येतील.

२) सत्र १ ते ८ च्या ई-सुविधा अंतर्गत अभ्यासक्रमासाठी प्रवेशित नियमित / रिपीटर विद्यार्थ्यांचे प्रिफिल्ड परीक्षा अर्ज ई-सुविधा विभागामार्फत संबंधित अभ्यासक्रमाच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यापासून ५ ते ७ दिवसात शैक्षणिक प्रशाळा/ विभागांच्या लॉगीन मध्ये उपलब्ध करुन देण्यात येतील.

३) जे विद्यार्थी वरील प्रिफील्ड अर्ज भरुन योग्य ते शुल्क विहित मुदतीत शैक्षणिक प्रशाळा / विभागांकडे जमा करतील अशाच विद्यार्थ्यांचे प्रिफिल्ड अर्ज शैक्षणिक प्रशाळा / विभागांनी ऑनलाईन इनवर्ड करावेत.

४) वरीलप्रमाणे इनवर्ड केलेल्या अर्जांची इनवर्ड यादी सोबत जोडलेल्या कार्यक्रम पत्रिकेप्रमाणे निर्धारीत मुदतीत जमा करावी.

५) जे परीक्षा अर्ज ऑनलाईन इनवर्ड होतील त्यांचे परीक्षा अर्ज शैक्षणिक प्रशाळा / विभागांकडे जमा करुन, फक्त इनवर्ड याद्या दोन प्रतीत परीक्षा विभागात जमा कराव्यात.

६) **जे विद्यार्थी प्रिफील्ड अर्ज भरुन शैक्षणिक प्रशाळा / विभागांकडे विहित मुदतीत जमा करणार नाहीत अथवा योग्य ते शुल्क मुदतीत जमा करणार नाहीत त्यांचे प्रिफील्ड अर्ज इनवर्ड करु नयेत. असे अर्ज इनवर्ड केल्यास तदअनुषंगाने विद्यार्थ्यास प्रवेशपत्र मिळाल्यास होणाऱ्या परिणामास संबंधीत शैक्षणिक प्रशाळा विभाग जबाबदार असेल तरी, प्रत्येक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थी संख्या, विहित शुल्कासह विहित मुदतीत प्राप्त झालेल्या परीक्षा अर्जांची संख्या व तसेच इनवर्ड केलेल्या परीक्षा अर्जांची संख्या यांचा पडताळणी करुनच अंतिम याद्या जमा कराव्यात.**

७) एक विद्यार्थी एका पेक्षा जास्त सत्राच्या परीक्षा देणार असेल अशा विद्यार्थ्यासाठी एकच परीक्षा अर्ज भरणे अपेक्षित असून, असे अर्ज Online Inward करतांना सर्व सत्रांचा परीक्षा अर्ज इनवर्ड होईल याची दक्षता घ्यावी.

८) Online Inward यादी जमा करतांना Exam form Submission Report हा Course-wise Option Select करुन सर्व सत्रांकरीताची एकत्रित Inward यादी जमा करावी. उदा. सीजीपीए या अभ्यासक्रमांकरीता सर्व सत्रांचा एकत्रित रिपोर्ट जमा करावा.

**ब) ई-सुविधेअंतर्गत प्रवेशित नसलेल्या विद्यार्थ्यांकरीता परीक्षा अर्ज भरण्यासंदर्भात सूचना :-**

ई-सुविधेअंतर्गत प्रवेशित नसलेल्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर Student Corner --> download format --> formate for student या लिंकवर उपलब्ध असलेल्या नमुन्यात विद्यार्थ्यांनी आपले परीक्षा अर्ज सोबतच्या तक्त्यात दर्शविलेल्या विहीत मुदतीत जमा करावयाचे आहेत व शैक्षणिक प्रशाळा / विभागांनी विहीत मुदतीत परीक्षा शुल्कासह सदर अर्ज अर्जाच्या यादीचा दोन प्रतींसह सादर करावयाचे आहेत.

**क) परीक्षेसंबंधी इतर महत्वाच्या सूचना :-**

१) अंध / अपंग विद्यार्थ्यांनी उत्तरपत्रिका लिहीण्यासाठी जास्तीची वेळ/ लेखनिक मिळणेसाठीचा अर्ज परीक्षा **अर्जासोबतच स्वतंत्र फाईलमध्ये** सादर करणे आवश्यक आहे. त्यासोबत जिल्हा शल्य चिकीत्सक यांनी विद्यार्थ्यांच्या अंध/ अपंगत्वाबाबत नजिकच्या कालावधीत निर्गमीत केलेले प्रमाणपत्र, लेखनिक म्हणून काम करणा-या व्यक्तीचा फोटो, बोनाफाईड प्रमाणपत्र व लेखनिकाचे संमतीपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे. लेखनिक हा विद्यार्थी ज्या वर्गाची परीक्षा देत असेल त्या वर्गापेक्षा कमी शिकलेला असावा. लेखनिक हा त्या परीक्षार्थी विद्यार्थ्यापेक्षा कमी शिकलेला असल्याची खात्री शैक्षणिक विभागांच्या संबंधित प्रमुखांनी करावयाची असून तसे प्रमाणपत्र सोबत द्यावयाचे आहे प्रत्यक्ष परीक्षा सुरु असतांना विद्यार्थी अंध / अपंग असल्याचे कागदपत्र व प्रत्यक्ष स्थिती पडताळणी करण्याची जबाबदारी संबधीत शैक्षणिक प्रशाळा संचालकांची / विभागांच्या प्रमुखांची राहील. त्यासाठी **विद्यापीठाचे परिपत्रक क्र.०२/२०१३ दि.१४/०१/२०१३** अन्वये कार्यवाही करावी.

२) डुप्लीकेट परीक्षा प्रवेश पत्रासाठी ॲडमिट कार्ड शुल्क रु. १००/- स्वतंत्र भरावे लागेल. त्यासाठी विभागप्रमुखांमार्फतच अर्ज स्विकारण्यात येतील.

३) ज्या विद्यार्थ्यांचे निकाल गैरप्रकार अथवा अन्य कारणांनी राखीव ठेवण्यात आलेले आहेत अशा विद्यार्थ्यांचे निकाल जाहीर झाल्यानंतर १५ दिवसाच्या आत त्यांनी त्याचा परीक्षा अर्ज नियमित शुल्कासह विद्यापीठात जमा करणे आवश्यक राहील. जे विद्यार्थी सदर मुदतीत अर्ज जमा करु शकले नाहीत, त्यांना वरील १५ दिवसानंतर ०८ दिवसापर्यंत विलंब शुल्क रु.५०/- भरुन परीक्षा अर्ज भरता येईल. परंतू असे अर्ज परीक्षा सुरु होण्याच्या २० दिवस आधी पर्यंतच सादर करता येतील.

४) **विद्यापीठ अधिकार मंडळाने २००९ मध्ये घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने दर तीन वर्षांनी परीक्षा शुल्क वाढीबाबत आढावा घ्यावयाचा असून त्याबाबत योग्य तो निर्णय वेळोवेळी कळविण्यात येईल. ?**

५) परीक्षा अर्ज विद्यापीठ संकेतस्थळावरुन प्रिन्ट काढावी व अर्ज जर दोन पानांत असेल तर त्याची प्रिन्ट दोनही बाजूने छापून घ्यावी व विद्यार्थ्यांकडून रुपये १०/- परीक्षा अर्जापोटी शुल्क आकारण्यात येऊन त्यातील फक्त परीक्षा अर्ज शुल्क रुपये ६/- (सहा) मात्र परीक्षा अर्जासोबत पाठवावेत.

६) **जे विद्यार्थी व्दितीय वर्ष ८०+२० किंवा १०० च्या पॅटर्न मध्ये उत्तीर्ण अथवा ए.टी.के.टी. प्राप्त करुन शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये सत्र पध्दतीमध्ये प्रवेशित झालेले असतील अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज तृतीय वर्षाच्या जुन्या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसोबत जमा करुन स्वतंत्ररित्या त्याच मुदतीत विद्यापीठात सादर करावेत. अशा विद्यार्थ्यांचे ऑनलाईन प्रवेश न करता मॅन्युअली परीक्षा अर्ज सादर करावेत.**

७) ज्या पदवी अभ्यासक्रमाच्या फक्त सामान्यज्ञान किंवा फक्त पर्यावरणशास्त्र विषय राहिला असेल तर अशा विद्यार्थ्यांनी केंद्रिय मुल्यमापन शुल्क रु.७०/-, परीक्षा शुल्क रु.२००/-, गुणपत्रक शुल्क रु.६०/- निर्धारीत तारखेच्या आत अर्जासह सादर करावेत.

८) सर्व अभ्यासक्रमातील प्रवेशित विद्यार्थ्यांची शैक्षणिक पात्रता अंतिम झाल्याशिवाय एम.के.सी.एल. कार्यप्रणाली अंतर्गत ऑनलाईन परीक्षा अर्ज स्विकारण्यात येऊ नयेत. तसेच हे अर्ज ऑनलाईन इनवर्ड करु नयेत.

९) मा.परीक्षा व मुल्यमापन मंडळाचा ठराव क्र. ३६/२०१७ नुसार, शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण-२०१६/प्रक्र-३०२/विशी-३, मंत्रालय, मुंबई-३२, दि.४ मर्च, २०१७ नुसार, उच्च शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांकरीता परीक्षेमध्ये सोयी-सवलती देण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यांत आला आहे. सदर शासन निर्णयात नमूद केलेल्या सर्व सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात. सदर शासन निणर्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

**एफ.वाय./ एस.वाय./टी.वाय. बी.बी.एम. CGPA या वर्गाचे ऑनलाईन परीक्षा अर्ज उपलब्ध करुन देण्यांत येणार नाहीत. तरी या वर्गांचे परीक्षा अर्ज मॅन्युअली पध्दतीने भरुन परीक्षा विभागात विहीत मुदतीत सादर करण्याची कार्यवाही करण्यांत यावी.**

**विद्यार्थ्याकडे गुणपत्रक उपलब्ध नसल्यास, विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या गुणपत्रकाची प्रिंट घेऊन त्याची प्रत परीक्षा अर्जासोबत जोडण्यांत यावी.**

**महत्वाच्या सुचनाः-**

**तरी कोवीड-१९ च्या अनुषंगाने महाविद्यालयास पुन:श्च कळविण्यांत येते की, Online परीक्षा अर्ज व Online शुल्क भरणेसाठी Digital University Portal [http://nmuj.digitaluniversity.ac] वर उपलब्ध असलेल्या Online Examination Form Submission या सुविधेव्दारे सर्व विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज व शुल्क भरण्यासंदर्भात आपल्या स्तरावर प्रोत्साहित करावे, जेणेकरुन कोवीड-१९ च्या प्रादुर्भावास आळा बसेल. परीक्षा अर्ज भरणेसाठी विद्यार्थ्यांना कोणत्याही परिस्थितीत महाविद्यालयात बोलवू नये व विद्यार्थ्यांनी देखील महाविद्यालयात जाऊ नये.**

**ऑन लाईन परीक्षा अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्यांना खालील सूचना देण्यांत याव्यात.**

**१) परीक्षा अर्ज भरतेवेळी ऑनलाईन फी भरण्यासाठी शक्यतो डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड किंवा नेट बँकिंगचा वापर करावा.**

**२) यु.पी.आय.व्दारे भरणा शक्यतो टाळावा.**

**३) ऑनलाईन परीक्षा फी भरतेवेळी काही कारणास्तव विद्यार्थ्यांच्या अकाऊंटमधून फी डेबिट झाली, तथापि, फॉर्म भरला गेला नसेल तर, पुन्हा पेमेंट करु नये.**

**४) ज्यांची परीक्षा फी अकाऊंटमधून डेबिट झाली, परंतु फॉर्म भरला गेला नाही, अशा विद्यार्थ्यांचे फॉर्म तीन ते चार दिवसांमध्ये बँक reconciliation नंतर auto submit होईल. तरी त्यासाठी पुन्ही फी भरण्याची घाई विद्यार्थ्यांनी करु नये.**

**शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी., एम.बी.ए., एम.सी.ए., एम.एस.डब्ल्यू., एम.एम.एस. (कॉप्युटर ॲण्ड पर्सनल मॅनेजमेंट), सत्र-१ मधील नियमित प्रवेशित विद्यार्थी तसेच प्रथम व व्दितीय वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, या विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरणेसाठीच्या तारखा निकाल जाहीर झाल्यानंतर स्वतंत्रपणे कळविण्यांत येतील. तरी या विद्यार्थ्यांनी त्यांचे व्दितीय व चतुर्थ सत्रातील परीक्षा अर्ज खालील वेळापत्रकाप्रमाणे भरावेत.**

कृपया या परीपत्रकासोबत जोडलेला तक्ता व वरील बाबी सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्याव्यात व परिपत्रकाप्रमाणे योग्य ती कार्यवाही करुन विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

(भ. प्र. पाटील)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जा.क्र.कबचौउमवि/७-अ/माहे मे, जून, जुलै-२०२१/९१५/२०२१
दिनांक :- ०३/०५/२०२१

प्रति,
मा.संचालक/विभागप्रमुख,
कबचौउमवि परिसरातील सर्व शैक्षणिक प्रशाळा व विभाग,
कबचौउमवि, जळगांव.

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी:**

१) मा.कुलगुरुकार्यालय, कबचौउमवि, जळगांव.
२) मा.व्यवस्थापन परिषद सदस्य कक्ष, कबचौउमवि, जळगांव.
३) मा.परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य, कबचौउमवि, जळगांव.
४) मा.कुलसचिव, कबचौउमवि, जळगांव.
५) मा.प्र.वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगांव.
६) प्र.संगणक केंद्र प्रमुख, कबचौउमवि, जळगांव.
७) सहा.कुलसचिव / कक्ष अधिकारी परीक्षा व मूल्यमापन विभाग (सर्व), कबचौउमवि, जळगांव.
८) समन्वयक, ई-सुविधा केंद्र, कबचौउमवि, जळगांव.

।। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।।

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

**परिपत्रक क्र. ७७/२०२१, दिनांक ०३/०५/२०२१ चे सहपत्र-१**
**(मानव विज्ञान व आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा)**

सर्व संबंधितांना या परीपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, सन २०२१ च्या प्रथमार्धात माहे मे/जून/जुलै-२०२१ मध्ये मध्ये कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ घेणार असलेल्या पदविका,पदवी व पदव्युत्तर परीक्षांचा कार्यक्रम (कबचौउमवि शैक्षणिक विभागांकरीता) खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे असून त्यात नमूद केलेल्या तारखांना परीक्षा अर्ज विद्यार्थ्यांकडून भरुन घेऊन संबंधीत विभागाने पाठवावेत.

| अ.क्र. | **परीक्षेचे नाव** | विलंब शुल्क विरहित परीक्षा अर्ज भरण्याची अंतिम तारीख (विद्यार्थ्यांसाठी) | रु. ५०/- विलंब शुल्कासह परीक्षा अर्ज भरण्याची अंतिम तारीख (विद्यार्थ्यांसाठी) | केंद्रिय मुल्यमापन शुल्क | पासिंग सर्टीफिकेट शुल्क (अंतिम वर्ष/ सत्रासाठी) | गुणपत्रक शुल्क | परीक्षा शुल्क | विलंब शुल्क विरहित परीक्षा अर्ज विद्यापीठ कार्यालयास सादर करण्याची अंतिम तारीख (शै.विभागांकरीता) | विलंब शुल्कासह परीक्षा अर्ज विद्यापीठ कार्यालयास सादर करण्याची अंतिम तारीख (शै.विभागांकरीता) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १. | एम.ए.(सत्र १ ते ४) (नाटयशास्त्र/संगीत/मास कम्युनिकेशन वगळता सर्व विषय) | १७.०५.२०२१ | २१.०५.२०२१ | रु. १०० /- (प्रति सत्र) | रु. ७०/- | रु. ७०/- | रु. २२० /- नियमित (प्रति सत्र)<br>रु. १४० /- रिपीटर (प्रति सत्र)<br>रु. १३०/- प्रोजेक्ट,<br>रु. १०० /- मौखिक व प्रात्यक्षिक | २५.०५.२०२१ | २५.०५.२०२१ |
| २. | एम.ए. (संगीत/नृत्य) (सत्र १ ते ४) | १७.०५.२०२१ | २१.०५.२०२१ | रु. १४० /- (प्रती सत्र) | **रु. ८० /-** | **रु. १००/-** | रु. ९०० /- नियमीत प्रत्येक सत्रासाठी<br>रु. ५०० /- रिपीटर प्रत्येक सत्रासाठी<br>रू.५००/- प्रात्यक्षिक शुल्क<br>रु ५००/- प्रोजेक्ट | २५.०५.२०२१ | २५.०५.२०२१ |
| ३. | एम.ए. (मास कम्युनिकेशन) (सत्र १ ते ४) | १७.०५.२०२१ | २१.०५.२०२१ | रु. १४० /- (प्रती सत्र) | **रू.८०/-** | **रु. १००/-** | रु. ४०० /- नियमीत प्रत्येक सत्रासाठी<br>रु. ३०० /- रिपीटर प्रत्येक सत्रासाठी<br>रू.५००/- प्रात्यक्षिक शुल्क | २५.०५.२०२१ | २५.०५.२०२१ |
| ४. | एम.एस.डब्ल्यु. (सत्र १ ते ४) | १७.०५.२०२१ | २१.०५.२०२१ | रु. १४० /- (प्रती सत्र) | रु. ८०/- | रु. ७० /- | रु. ६०० /- नियमीत प्रत्येक सत्रासाठी, रु. ३५० /- रिपीटर प्रत्येक सत्रासाठी ,रु ४००/- प्रोजेक्ट | २५.०५.२०२१ | २५.०५.२०२१ |
| ५. | बी.ए.(Additional Music) | १७.०५.२०२१ | २१.०५.२०२१ | रु. ६०/- प्रती वर्ष | ---- | रु. १२० /- | रु. २०००/- नियमित,<br>रु. १२००/- रिपीटर | २५.०५.२०२१ | २५.०५.२०२१ |

**ज्या अभ्यासकमाच्या परीक्षेच्या संधी संपल्या असतील त्या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना समकक्ष विषयांप्रमाणे परीक्षा द्यावी लागेल. कोवीड-१९ चा प्रादुर्भाव पाहता, विद्यापीठाने विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन परीक्षा अर्ज व शुल्क जमा करण्याचे सुविधा विद्यापीठाच्या nmuj.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिलेली आहे. विद्यार्थ्यांना Online Payment Gateway/Debit/Credit Card इत्यादिंच्या माध्यमातून परीक्षा शुल्क हे Online भरण्यासाठी http://nmuj.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर Online Examination Form Submission या Title वर उपलब्ध आहे.**

।। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।।

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

**परिपत्रक क्र. ७७/२०२१, दिनांक ०३/०५/२०२२ चे सहपत्र-२ (वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्रे विद्याशाखा)**

सर्व संबंधितांना या परीपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, सन २०२१ च्या प्रथमार्धात माहे मे/जून/जुलै-२०२१ मध्ये मध्ये कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ घेणार असलेल्या पदविका, पदवी व पदव्युत्तर परीक्षांचा कार्यक्रम (कबचौउमवि शैक्षणिकविभागांकरीता) खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे असून त्यात नमूद केलेल्या तारखांना परीक्षा अर्ज विद्यार्थ्यांकडून भरुन घेऊन संबंधित विभागाने पाठवावेत. **(वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्रे विद्याशाखा)**

| अ.क्र. | परीक्षेचे नाव | विलंब शुल्क विरहित परीक्षा अर्ज भरण्याची अंतिम तारीख (विद्यार्थ्यांसाठी) | रु. ५०/- विलंब शुल्कासह परीक्षा अर्ज भरण्याची अंतिम तारीख (विद्यार्थ्यांसाठी) | केंद्रिय मुल्यमापन शुल्क | पासिंग सर्टीफिकेट शुल्क (अंतिम वर्ष/ सत्रासाठी) | गुणपत्रक शुल्क | परीक्षा शुल्क | विलंब शुल्क विरहित परीक्षा अर्ज विद्यापीठ कार्यालयास सादर करण्याची अंतिम तारीख (शै.विभागांकरीता) | विलंब शुल्कासह परीक्षा अर्ज विद्यापीठ कार्यालयास सादर करण्याची अंतिम तारीख (शै.विभागांकरीता) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १. | बी.बी.एम. (बी.बी.एस.) (सत्र १ ते ६) (जुना अभ्यासक्रमासाठी) | १२.०५.२०२१ | १७.०५.२०२१ | रु. १२०/- (प्रत्येक सत्रासाठी स्वतंत्र) | * रु. ८०/- | रु.७०/- | रु. ५५०/- नियमीत (प्रती सत्र), रु. ३५०/- रिपीटर (प्रती सत्र), रु. ४०/- पर्यावरणशास्त्र रू. ४००/- प्रोजेक्ट व व्हायवा | १९.०५.२०२१ | १९.०५.२०२१ |
| २. | बी.बी.एम. (बी.बी.एस.) (सत्र १ ते ६) (C.G.P.A.) बी.एम.एस. (सत्र-१ ते २) | १२.०५.२०२१ | १७.०५.२०२१ | रु. १२०/- (प्रत्येक सत्रासाठी स्वतंत्र) | * रु. ८०/- | रु.७०/- | रु. ५५०/- नियमीत (प्रती सत्र), रु. ३५०/- रिपीटर (प्रती सत्र), रु. ४०/- पर्यावरणशास्त्र रू. ४००/- प्रोजेक्ट व व्हायवा | १९.०५.२०२१ | १९.०५.२०२१ |
| ३. | एम.बी.ए. (C.G.P.A.) All (सत्र १ ते ४) (जुना अभ्यासक्रमासहीत) | १७.०५.२०२१ | २१.०५.२०२१ | रु. १४०/- प्रती सत्र | *रु. ८०/- | रु. १२०/- | रु. १४००/- नियमित (प्रती सत्र) रु. ६००/- रिपीटर (प्रती सत्र) रु.१०००/- प्रोजेक्ट | २५.०५.२०२१ | २५.०५.२०२१ |

**ज्या अभ्यासकमाच्या परीक्षेच्या संधी संपल्या असतील त्या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना समकक्ष विषयांप्रमाणे परीक्षा द्यावी लागेल. कोवीड-१९ चा प्रादुर्भाव पाहता, विद्यापीठाने विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन परीक्षा अर्ज व शुल्क जमा करण्याचे सुविधा विद्यापीठाच्या nmuj.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिलेली आहे. विद्यार्थ्यांना Online Payment Gateway/Debit/Credit Card इत्यादिंच्या माध्यमातून परीक्षा शुल्क हे Online भरण्यासाठी http://nmuj.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर Online Examination Form Submission या Title वर उपलब्ध आहे. सर्व संबंधितांनी तसेच विद्यार्थ्यांनी सदर परिपत्रकातील पान क्र. ३ व ४ वर नमूद केलेल्या महत्वाच्या सुचनांचे कटाक्षाने अवलोकन करुन कार्यवाही करावी.**

।। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।।

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

**परिपत्रक क्र. ७७/२०२१, दिनांक ०३/०५/२०२१ चे सहपत्र-३ (विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा)**

सर्व संबंधितांना या परीपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, सन २०२१ च्या प्रथमार्धात माहे मे/जून/जुलै-२०२१ मध्ये मध्ये कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ घेणार असलेल्या पदविका, पदवी व पदव्युत्तर परीक्षांचा कार्यक्रम (कबचौउमवि शैक्षणिकविभागांकरीता) खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे असून त्यात नमूद केलेल्या तारखांना परीक्षा अर्ज विद्यार्थ्यांकडून भरुन घेऊन संबंधित विभागाने पाठवावेत. **(विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा)**

| अ.क्र. | परीक्षेचे नाव | विलंब शुल्क विरहित परीक्षा अर्ज भरण्याची अंतिम तारीख (विद्यार्थ्यांसाठी) | रु. ५०/- विलंब शुल्कासह परीक्षा अर्ज भरण्याची अंतिम तारीख (विद्यार्थ्यांसाठी) | केंद्रिय मुल्यमापन शुल्क | पासिंग सर्टीफिकेट शुल्क (अंतिम वर्ष/ सत्रासाठी) | गुणपत्रक शुल्क | परीक्षा शुल्क | विलंब शुल्क विरहित परीक्षा अर्ज विद्यापीठ कार्यालयास सादर करण्याची अंतिम तारीख (शै.विभागांकरीता) | विलंब शुल्कासह परीक्ष विद्यापीठ कार्यालयास करण्याची अंतिम त (शै.विभागांकरीत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १ | एम.एस्सी. (सत्र १ ते ४) (कॉम्प्युटर सायन्स, इन्फॉमेशन टेक्नॉलॉजी, मायक्रोबॉयलॉजी, बायोकेमेस्ट्री व बायोटेक्नॉलॉजी वगळता सर्व विषय) | १७.०५.२०२१ | २१.०५.२०२१ | रु. १००/- (प्रती सत्र) | *रू.७०/- | रु. ७०/- | रु. ६००/- (प्रती सत्र) नियमीत<br>रिपीटर- (प्रती सत्र)<br>०२ विषयांसाठी रू.२००/-,<br>०२ पेक्षा अधिक विषयांसाठी रु.४००/-.<br>**रु.४००/-प्रोजेक्ट व व्हायवासाठी** | २५.०५.२०२१ | २५.०५.२०२१ |
| २ | एम.सी.ए. (सत्र १ ते ६) एम.एस्सी. (कॉम्प्यु.सायन्स, आय.टी.सत्र १ ते ४) | १७.०५.२०२१ | २१.०५.२०२१ | रु. १५०/- (प्रती सत्र) | रु.८०/- | रु. ७०/- | रु. ८००/- प्रती सत्र, नियमित<br>रु. ५०० /- प्रती सत्र रिपीटर<br>रुपये १०००/- प्रोजेक्ट व व्हायवासाठी | २५.०५.२०२१ | २५.०५.२०२१ |
| ३ | बी.एस्सी. (अक्यु. सायन्स) (सत्र १ ते ६) | १७.०५.२०२१ | २१.०५.२०२१ | रु. १००/- (प्रती सत्र) | *रु.८० | रु.७०/- | रु. ६००/- नियमित (प्रती सत्र)<br>रु. ४००/- रिपीटर (प्रती सत्र) | २५.०५.२०२१ | २५.०५.२०२१ |
| ४ | एम.एस्सी. (सत्र १ ते ४) (मायक्रोबॉयलॉजी, बायोकेमेस्ट्री व बायोटेक्नॉलॉजी) | १७.०५.२०२१ | २१.०५.२०२१ | रु. १५०/- (प्रती सत्र) | रु.८०/- | रु. ७०/- | रु. ८००/- (प्रती सत्र) नियमीत<br>रिपीटर- (प्रती सत्र)<br>०२ विषयांसाठी रू.२००/-,<br>०२ पेक्षा अधिक विषयांसाठी रु.४००/-.<br>रु.४००/- प्रोजेक्ट व व्हायवासाठी | २५.०५.२०२१ | २५.०५.२०२१ |

**ज्या अभ्यासकमाच्या परीक्षेच्या संधी संपल्या असतील त्या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना समकक्ष विषयांप्रमाणे परीक्षा द्यावी लागेल. कोवीड-१९ चा प्रादुर्भाव पाहता, विद्यापीठाने विद्यार्थ्यांसाठी ऑनला परीक्षा अर्ज व शुल्क जमा करण्याचे सुविधा विद्यापीठाच्या nmuj.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिलेली आहे. विद्यार्थ्यांना Online Payment Gateway/Debit/Cr Card इत्यादिंच्या माध्यमातून परीक्षा शुल्क हे Online भरण्यासाठी http://nmuj.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर Online Examination Form Submission या Title वर उपलब्ध आहे. सर्व संबंधितांनी तसेच विद्यार्थ्यांनी सदर परिपत्रकातील पान क्र. ३ व ४ वर नमूद केलेल्या महत्वाच्या सुचनांचे कटाक्षाने अवलोकन करुन कार्यवाही करावी.**

।। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।।

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

**परिपत्रक क्र.७७/२०२१, दिनांक ०३/०५/२०२१ चे सहपत्र-४**
**(विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा-अभियांत्रिकी)**

सर्व संबंधितांना या परीपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, सन २०२१ च्या प्रथमार्धात माहे मे/जून/जुलै-२०२१ मध्ये मध्ये कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ घेणार असलेल्या पदविका, पदवी व पदव्युत्तर परीक्षांचा कार्यक्र (कबचौउमवि शैक्षणिकविभागांकरीता) खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे असून त्यात नमूद केलेल्या तारखांना परीक्षा अर्ज विद्यार्थ्यांकडून भरुन घेऊन संबंधित विभागाने विद्यापीठास पाठवावेत.

| अ.क्र. | परीक्षेचे नाव | विलंब शुल्क विरहित परीक्षा अर्ज भरण्याची अंतिम तारीख (विद्यार्थ्यांसाठी) | रु. ५०/- विलंब शुल्कासह परीक्षा अर्ज भरण्याची अंतिम तारीख (विद्यार्थ्यांसाठी) | केंद्रिय मुल्यमापन शुल्क | पासिंग सर्टीफिकेट शुल्क (अंतिम वर्ष/ सत्रासाठी) | गुणपत्रक शुल्क | परीक्षा शुल्क | विलंब शुल्क विरहित परीक्षा अर्ज विद्यापीठ कार्यालयास सादर करण्याची अंतिम तारीख (शै.विभागांकरीता) | विलंब शुल्कासह परीक्षा अर्ज विद्यापीठ कार्यालयास सादर करण्याची अंतिम तारीख (शै.विभागांकरीता) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १. | प्रथम/व्दितीय / तृतीय व चतुर्थ वर्ष केम. इंजि. /बी.टेक. (नवा व जुना अभ्यासक्रम ) सत्र १ ते ८ | १७.०५.२०२१ | २१.०५.२०२१ | रु. १२०/- (प्रती सत्र) | रु. ८० | रु. ७०/- | नियमित रु. ९०० /- (प्रती सत्र)<br>रिपीटर (प्रती सत्र)- ०१ ते ०३ विषयांसाठी रु.३००/-, ०३ पेक्षा अधिक विषयांसाठी रु.५००/-.<br>रु. ४०/- पर्यावरणशास्त्र | २५.०५.२०२१ | २५.०५.२०२१ |
| २. | एम. टेक सत्र १ ते ४ | १७.०५.२०२१ | २१.०५.२०२१ | रु. १४०/- (प्रती सत्र) | रु. ८०/- | रु. १२५/- | नियमित रु.१९००/- प्रती सत्र<br>रिपीटर रु. १२००/- प्रती सत्र | २५.०५.२०२१ | २५.०५.२०२१ |

**ज्या अभ्यासकमाच्या परीक्षेच्या संधी संपल्या असतील त्या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना समकक्ष विषयांप्रमाणे परीक्षा द्यावी लागेल. कोवीड-१९ चा प्रादुर्भाव पाहता, विद्यापीठाने विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन परीक्षा अर्ज व शुल्क जमा करण्याचे सुविधा विद्यापीठाच्या nmuj.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिलेली आहे. विद्यार्थ्यांना Online Payment Gateway/Debit/Credit Card इत्यादिंच्या माध्यमातून परीक्षा शुल्क हे Online भरण्यासाठी http://nmuj.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर Online Examination Form Submission या Title वर उपलब्ध आहे. सर्व संबंधितांनी तसेच विद्यार्थ्यांनी सदर परिपत्रकातील पान क्र. ३ व ४ वर नमूद केलेल्या महत्वाच्या सुचनांचे कटाक्षाने अवलोकन करुन कार्यवाही करावी.**

।। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।।

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

**परिपत्रक क्र. ७७/२०२१, दिनांक ०३/०५/२०२१ चे सहपत्र-५**
**(आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा -शिक्षणशास्त्र)**

सर्व संबंधितांना या परीपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, सन २०२१ च्या प्रथमार्धात माहे मे/जून/जुलै-२०२१ मध्ये मध्ये कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ घेणार असलेल्या पदविका, पदवी व पदव्युत्तर परीक्षांचा कार्यक्रम खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे असून त्यात नमूद केलेल्या तारखांना परीक्षा अर्ज विद्यार्थ्यांकडून भरुन घेऊन महाविद्यालयाने विद्यापीठास पाठवावेत.

| अ.क्र. | परीक्षेचे नाव | विलंब शुल्क विरहित परीक्षा अर्ज भरण्याची अंतिम तारीख (विद्यार्थ्यांसाठी) | रु. ५०/- विलंब शुल्कासह परीक्षा अर्ज भरण्याची अंतिम तारीख (विद्यार्थ्यांसाठी) | केंद्रिय मुल्यमापन शुल्क | पासिंग सर्टीफिकेट शुल्क (अंतिम वर्ष/ सत्रासाठी) | गुणपत्रक शुल्क | परीक्षा शुल्क | विलंब शुल्क विरहित परीक्षा अर्ज विद्यापीठ कार्यालयास सादर करण्याची अंतिम तारीख (शै.विभागांकरीता) | विलंब शुल्कासह परीक्षा अर्ज विद्यापीठ कार्यालयास सादर करण्याची अंतिम तारीख (शै.विभागांकरीता) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १. | एम.एड. (जनरल) (नविन अभ्यासक्रम सत्र १ व ४) | १७.०५.२०२१ | २१.०५.२०२१ | रु. १४०/- | रु. ८०/- | रु. ७०/- | रु. ८००/- नियमित (सत्र १ व २ साठी स्वतंत्र) रु. ५००/- रिपीटर (सत्र १ व २ साठी स्वतंत्र) | २५.०५.२०२१ | २५.०५.२०२१ |
| २. | एम.एड. (जनरल) (भाग १ व २ जुना) | १७.०५.२०२१ | २१.०५.२०२१ | रु. १४०/- | रु. ८०/- | रु. ७०/- | रु. ८००/- नियमित (भाग १ व २ साठी स्वतंत्र) रु. ५००/- रिपीटर (भाग १ व २ साठी स्वतंत्र) | २५.०५.२०२१ | २५.०५.२०२१ |

**ज्या अभ्यासकमाच्या परीक्षेच्या संधी संपल्या असतील त्या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना समकक्ष विषयांप्रमाणे परीक्षा द्यावी लागेल. कोवीड-१९ चा प्रादुर्भाव पाहता, विद्यापीठाने विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन परीक्षा अर्ज व शुल्क जमा करण्याचे सुविधा विद्यापीठाच्या nmuj.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिलेली आहे. विद्यार्थ्यांना Online Payment Gateway/Debit/Credit Card इत्यादिंच्या माध्यमातून परीक्षा शुल्क हे Online भरण्यासाठी http://nmuj.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर Online Examination Form Submission या Title वर उपलब्ध आहे. सर्व संबंधितांनी तसेच विद्यार्थ्यांनी सदर परिपत्रकातील पान क्र. ३ व ४ वर नमूद केलेल्या महत्वाच्या सुचनांचे कटाक्षाने अवलोकन करुन कार्यवाही करावी.**

।। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।।

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

**परिपत्रक क्र. ७७/२०२१, दिनांक ०३/०५/२०२१ चे सहपत्र-६ (मानवविज्ञान विद्याशाखा-विधी)**

सर्व संबंधितांना या परीपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, सन २०२१ च्या प्रथमार्धात माहे मे/जून/जुलै-२०२१ मध्ये मध्ये मध्ये कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ घेणार असलेल्या पदविका, पदवी व पदव्युत्तर परीक्षांचा कार्यक्र खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे असून त्यात नमूद केलेल्या तारखांना परीक्षा अर्ज विद्यार्थ्यांकडून भरुन घेऊन महाविद्यालयाने विद्यापीठास पाठवावेत.

| अ.क्र. | परीक्षेचे नाव | विलंब शुल्क विरहित परीक्षा अर्ज भरण्याची अंतिम तारीख (विद्यार्थ्यांसाठी) | रु. ५०/- विलंब शुल्कासह परीक्षा अर्ज भरण्याची अंतिम तारीख (विद्यार्थ्यांसाठी) | केंद्रिय मुल्यमापन शुल्क | पासिंग सर्टीफिकेट शुल्क (अंतिम वर्ष/ सत्रासाठी) | गुणपत्रक शुल्क | परीक्षा शुल्क | विलंब शुल्क विरहित परीक्षा अर्ज विद्यापीठ कार्यालयास सादर करण्याची अंतिम तारीख (शै.विभागांकरीता) | विलंब शुल्कासह परीक्षा अर्ज विद्यापीठ कार्यालयास सादर करण्याची अंतिम तारीख (शै.विभागांकरीता) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १. | पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम (PG Diploma Courses) | ०१.०६.२०२१ | ०५.०६.२०२१ | रु. १२०/- (प्रती सत्र) | रु. ८० | रु. ७०/- | रु.६०० /- नियमित (प्रती सत्र)<br>रु.५००/- रिपीटर (प्रती सत्र) | ०९.०६.२०२१ | ०९.०६.२०२१ |

**ज्या अभ्यासकमाच्या परीक्षेच्या संधी संपल्या असतील त्या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना समकक्ष विषयांप्रमाणे परीक्षा द्यावी लागेल. कोवीड-१९ चा प्रादुर्भाव पाहता, विद्यापीठाने विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन परीक्षा अर्ज व शुल्क जमा करण्याचे सुविधा विद्यापीठाच्या nmuj.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिलेली आहे. विद्यार्थ्यांना Online Payment Gateway/Debit/Credit Card इत्यादिंच्या माध्यमातून परीक्षा शुल्क हे Online भरण्यासाठी http://nmuj.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर Online Examination Form Submission या Title वर उपलब्ध आहे. सर्व संबंधितांनी तसेच विद्यार्थ्यांनी सदर परिपत्रकातील पान क्र. ३ व ४ वर नमूद केलेल्या महत्वाच्या सुचनांचे कटाक्षाने अवलोकन करुन कार्यवाही करावी.**